Received on : 01/07/2021 Accepted on : 15/07/2021 Publication Date: 31/07/2021

# शालेय माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमांची परिणामकारकता

**[1] सुनीता माधवराव बिराजदार, [2] डॉ. संघमित्रा गोणारकर**
[1] संशोधिका, शिक्षणशास्त्र संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, महाराष्ट्र राज्य.
Email – birajdarsunitam10@gmail.com
[2] मार्गदर्शक, प्राचार्या – सावित्रीबाई फुले अध्यापक महाविद्यालय, सिडको, नांदेड

**सार-संदेश (Abstract) :** शालेय माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत 'किशोरी उत्कर्ष मंच' अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतो. माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाच्या दृष्टीने चालू असलेल्या प्रयत्नाचा किशोरी उत्कर्ष मंच हा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. माध्यमिक शिक्षणाच्या स्तरावरील मुलींची पटनोंदणी 100 टक्के करणे, त्यांची गळती होऊ नये म्हणून प्रयत्न करणे, त्यांच्या शिक्षणात गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्यासाठी शाळास्तरावर नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे व हे राबवावयाचे सर्व उपक्रम एका छताखाली आणून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी किशोरी उत्कर्ष मंचची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिलेली आहे. किशोरवयीन मुलींच्या सर्वांगीण प्रगतीसाठी, त्यांचे व्यक्तिमत्व सुधारण्यासाठी व त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होण्यासाठी हा मंच अत्यंत उपयुक्त आहे. मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत आवश्यक असणाऱ्या विविध उपक्रमांचे आयोजन कसे करावे?, कोणते नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे आवश्यक आहे? यासंबंधी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभाग तसेच यशदा ही संस्था सातत्याने संशोधन करीत आहे व त्यांच्या अभ्यासातून किशोरी उत्कर्ष मंच संकल्पना पुढे आलेली आहे. माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, शैक्षणिक गुणवत्ता वाढ व माध्यमिक शिक्षणाची समानसंधी ही राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानाची उद्दिष्ट्ये आहेत. ही उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी व शाळा स्तरावर मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत वाखाणण्याजोगी गुणवत्ता वाढ व्हावी म्हणून व शाळास्तरावर फक्त मुलींसाठी स्वतंत्र व्यासपीठ असावे म्हणून सदरहू मंचाची स्थापना करण्यात आली आहे. हा मंच माध्यमिक स्तरावरील मुलींची होणारी गळती कमी करतो, त्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण कमी करून उपस्थितीचे प्रमाण वाढवितो. तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण, शहरी व आदिवासी भागातील मुलींच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, लिंगभेद भावात्मक इ. सारख्या विविध कारणांमूळे मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत येणारे अडथळे किशोरी उत्कर्ष मंच दूर करतो व येणाऱ्या अडथळ्यावर प्रभावी उपाययोजना करण्याचे काम करतो. म्हणून या मंचाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

**बीज शब्द : संकेतशब्द (Key Words):**
1. किशोरवयीन - शालेय माध्यमिक स्तरावरील वय वर्षे 10 ते 19 वर्षे वयाच्या मुली.
2. उपक्रम – योजना, प्रकल्प
3. किशोरी उत्कर्ष मंच – किशोरींच्या विकासासाठी राबवावयाच्या उपक्रमांची योजना.
4. न्यादर्श – नमुना निवड
5. जनसंख्या – लोकसंख्या

## 1. प्रस्तावना (Introduction) :

भारतीय राज्यघटनेच्या कलम 45 प्रमाणे प्रत्येक मुलां-मुलींस वयाच्या 14 वर्षापर्यंत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे देण्याची तरतूद करण्यात आली होती परंतु माध्यमिक शिक्षण स्तरावर तशी तरतूद करण्यात आली नाही. माध्यमिक शिक्षणाने भावी जीवनाची ओळख होते. माध्यमिक शिक्षण हेच उच्च शिक्षणाचा पाया आहे. राज्यात 25 हजार 737 माध्यमिक शाळा आहेत. त्या शाळांमध्ये 66 लाख 14 हजार 654 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या स्तरावर अध्यापनासाठी दोन लाख 12 हजार 981 शिक्षक कार्यरत आहेत. राज्यात एकूण 9 माध्यमांच्या शाळा आहेत. शालेय माध्यमिक स्तरावरील वय वर्ष 10 ते 19 या वयोगटातील मुलींना किशोरवयीन मुली म्हणतात. एकूण लोकसंख्येच्या 23 टक्के मुले-मुली हे किशोरवयीन आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या 86 व्या घटना दुरूस्तीने 14 वर्ष वयोगटातील प्रत्येक बालकांना मोफत व सक्तीचा हक्क प्राप्त झालेला असताना देखील आणखीही मुलींच्या शिक्षणात म्हणावी तेवढी प्रगती झाली नाही. तसेच जागरूकताही झाली नाही. महाराष्ट्र राज्यातील मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण हे 75.48 असून ते ग्रामीण भागात 67.43 टक्के एवढेच अल्पप्रमाणात आहे. प्राथमिक स्तरावरील मुलींचे शिक्षण घटत घटत ते माध्यमिक स्तरावर अवघे 54 टक्के इतके झाले आहे. शिक्षण हे मानवी जीवनाचे ध्येय राहिले असून तेच मानवाच्या सर्वांगीण सुधारणेचे प्रवेशद्वार असल्याचे म. फुले यांनी नमूद केले आहे. सावित्रीबाई फुलेंनी स्त्रीशिक्षणाची

मुहूर्तमेढ रोवून खऱ्या अर्थाने स्त्री शिक्षणाची जाणीव जागृती केली व संपूर्ण समाजमन ढवळून निघाले. सध्याची शिक्षण पध्दती ही बालकेंद्री म्हणून गणली गेली आहे. मुलींचे शिक्षणही आजच्या 21 व्या शतकाची प्रमुख गरज निर्माण झालेली आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांचा 'सर्वांगीण विकास' हेच अंतिम ध्येय (Indian Education Policy, IEP 1992) ने निश्चित केलेले आहे. शिक्षणातून मुलींचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक व सामाजिक विकास साधला जाणे अपेक्षित असते.

सद्यस्थितीतही 91 टक्के शाळेमध्ये किशोरवयीन मुलींच्या समस्येची सोडवणूक होत नसल्याचे वास्तव निदर्शनास आले आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाचा शालेय शिक्षण विभाग, 'मुलींचे शिक्षण प्रगतीचे लक्षण', 'बेटी बचाओ, बेटी पढाओं', 'बेटी धन की पेटी', 'कन्या सुरक्षा कवच' अशा विविध घोषणांतून स्त्री शिक्षणाचा जागर वाढवू पाहत आहे. तसेच, 'लेक शिकवा अभियान', 'मुलीला शिकू द्या, वाढू द्या', 'माणूस म्हणून जगू द्या', 'मुलींना वाचवा मुलींना शिकवा', 'आपल्या मुली जर शिकल्या छान तर होईल आपल्या देशाचे कल्याण' इ. अशा अनेक घोषवाक्यांनी व ध्येयांनी प्रेरित होऊन किशोरींच्या शिक्षणावर शासन प्रकाश टाकू इच्छित आहे.

आजच्या किशोरवयीन मुली याच उद्याच्या भारताच्या भावी नागरिक आहेत. त्यामुळे शालेय माध्यमिक स्तरावरच त्यांच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक विकासाचा पाया मजबूत करून त्यांचा 'सर्वांगीण विकास' करणे आवश्यक आहे व हे काम किशोरी उत्कर्ष मंचच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे होवू शकते.

## 2. संबंधित साहित्याचा आढावा (Literature Review) :

1. किशोरों के व्यक्तित्व विकासपर सामाजिक-आर्थिक स्थिति के प्रभाव का एक अध्ययन.
   संशोधक – ज्योत्सना सिंह, वर्ष – 2004
   विद्यापीठ – पूर्वांचल विश्वविद्यालय, जौनपूर (उ. प्र.)
2. किशोर वय के छात्रों की व्यक्तित्व संरचना में संस्कृति की भूमिका.
   संशोधक – गणेशजी सिंह, वर्ष – 2009
   विद्यापीठ – वीर बहादुर सिंह पूर्वांचल विश्वविद्यालय, जौनपूर (उ. प्र.)
3. The Impact of the teaching of the Bible on the wholesome personality development of Adolescent – A Descriptive study.

   Researcher – Prescilla D. V., Year – 2005

   University of Madras, Chennai – 600 007

## 3. साधने (Materials) :

1. समतुल्य द्विगट अभिकल्पातील विद्यार्थी पूर्व चाचणी व विद्यार्थी उत्तर चाचणी.

## 4. संशोधन पध्दती (Research Methodology) :

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यातील जि. प. प्रशाला, नळेगाव व श्री शंकर विद्यालय, आटोळा या दोन शाळांची व तेथील इ. 9 वी व 10 वी च्या वर्गातील प्रत्येकी 50-50 अशा 100 किशोरवयीन मुलींची जनसंख्या विचारात घेण्यात आली. कार्यवाहीचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत –

1. प्रयोजनासाठी निवडलेल्या 100 किशोरवयीन मुलींना पूर्व चाचणी देण्यात आली.
2. पूर्व चाचणीच्या निकालाच्या आधारे एक गट नियंत्रित तर दुसरा गट प्रयोगिक असे निश्चित करण्यात आले.
3. प्रायोगिक गटावर किशोरी उत्कर्ष मंचच्या उपक्रमाची उपचार मात्रा देण्यात आली तर नियंत्रित गटास त्यापासून वंचित ठेवले गेले.
4. नंतर दोन्ही गटास उत्तर चाचणी देऊन उत्तर चाचणीतील प्राप्तांकाचे मध्यमान काढून त्यावरून प्रयोगाची परिणामकारकता ठरविण्यात आली.
5. प्राप्त माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करण्यात आले व शेवटी निष्कर्ष मांडण्यात आले.

**समतुल्य द्विगट अभिकल्पाची मांडणी**




**5. कार्यवाहीची चर्चा (Discussion) :**

प्रस्तुत संशोधन हे इ. 9 वी व 10 वी च्या शालेय माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमांच्या योगदानाचा अभ्यास करण्यासाठी प्रयोगाद्वारे तपासण्यात आले. प्रयोगाद्वारे प्राप्तकांचे मध्यमान काढून माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

**6. विश्लेषण (Analysis) :**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमांच्या योगदानाचा अभ्यास करण्यात आला. त्यामध्ये असे आढळून आले की, माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, बौध्दिक, शैक्षणिक इत्यादी बाबत येणाऱ्या अडचणी व समस्या तसेच त्यांच्या प्रगतीत येणारे अडथळा किशोरी उत्कर्ष मंचच्या साहाय्याने समजून घेऊन त्यावर प्रभावी उपाययोजना करणे शक्य होते. किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमाचा ज्या गटावर वापर करण्यात आला तो गट किशोरी उत्कर्ष मंचचा उपयोग न केलेल्या गटापेक्षा प्रगत दिसून आला. माहितीचे अर्थ निर्वचन करून विश्लेषणावरून निष्कर्ष प्राप्त झाले. निष्कर्षाची व्यवस्थित मांडणी केली. निवडलेल्या दोन्ही गटातील किशोरवयीन मुलींच्या उत्तर चाचणीतील मिळालेल्या प्राप्तांकाचे मध्यमान काढून त्या दोन्ही मध्यमानाची तुलना केली व किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमाची किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीतील परिणामकारकता तपासली.

**7. निष्कर्ष (Findings) :**

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत –

1. माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या पटनोंदणीचे प्रमाण 100 टक्के पर्यंत वाढविण्यासाठी किशोरी उत्कर्ष मंच अत्यंत महत्त्वाचा आहे.
2. माध्यमिक शाळेतील किशोरवयीन मुलींची गळती होवू नये व त्या शाळेत टिकून राहाव्यात म्हणून प्रभावी उपाययोजना सुचविण्याचे काम किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमामुळे सुलभ होते.
3. किशोरवयीन मुलींमधील लिंगसमभाव वाढीस लागतो व त्यांची शैक्षणिक प्रगती साधते.
4. विविध आनंददायी उपक्रमातून किशोरवयीन मुलींमध्ये आत्मविश्वास व जीवनकौशल्य विकसित करून व्यक्तिमत्त्व विकास साधण्याची प्रक्रिया किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमामुळे परिणामकारकपणे घडून येते.
5. किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या विविध समस्यांचा शोध घेवून त्यावर प्रभावी उपाययोजना सुचविण्याचे काम किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमामुळे परिणामकारकपणे साधले जाते.

Shikshan Sanshodhan : Journal of Arts, Humanities and Social Sciences ISSN: 2581-6241 Volume - 4, Issue - 7, July - 2021
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal Impact Factor: 3.871
Received on : 01/07/2021 Accepted on : 15/07/2021 Publication Date: 31/07/2021

**8. परिणाम (Results) :**

शालेय माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत किशोरी उत्कर्ष मंचच्या माध्यमातून राबविण्यात येणारे विविध उपक्रम मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत पोषक ठरतात. त्यांच्या गळतीचे प्रमाण कमी होते. दैनंदिन उपस्थिती वाढते. त्यांची पटनोंदणी 100 टक्के पर्यंत वाढवून विविध आनंददायी उपक्रमातून त्यांच्यातील आत्मविश्वास, जीवनकौशल्ये व व्यक्तिमत्त्व विकास साधला जातो. गळती, स्थगिती व त्यांची अनुपस्थिती इत्यादी कारणांचा शोध घेवून पालकांचे उद्बोधन करून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बदल करण्याचे काम किशोरी उत्कर्ष मंचच्या माध्यमातून केले जाते.

**9. शिफारशी (Recommendation) :**

1. शालेय माध्यमिक स्तरावरील किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे.
2. माध्यमिक स्तरावरील मुलींची गळती व स्थगिती तसेच त्यांच्या अनुपस्थितीचे प्रमाण कमी होण्यासाठी पालकांचे प्रभावी उद्बोधन होणे आवश्यक आहे.
3. मुलींच्या शैक्षणिक प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी माध्यमिक स्तरावरील महिला शिक्षिकांचे प्रमाण वाढविण्यात यावे.
4. महिला समुपदेशकांची नियुक्ती केल्यास त्यांच्या समस्यांचे निराकरण होऊ शकते.
5. प्राथमिक स्तरावरील मोफत शालेय गणवेश, शालेय पोषण आहार, मोफत पाठ्यपुस्तके वाटप योजना, माध्यमिक स्तरावरही सुरू करणे गरजेचे वाटते.

| अ.क्र. | शाळांची संख्या | इ.9 वी व इ. 10 वीतील विद्यार्थ्यांची जनसंख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | नियंत्रित गट | प्रायोगिक गट | |
| | | मुली | मुली | |
| 1. | 02 | 50 | 50 | 100 |

**10. निष्कर्ष (Conclusion) :**

प्रस्तुत संशोधन हे शालेय माध्यमिक स्तरावरील इ. 9 वी व 10 वी च्या किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीतील किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमांच्या परिणामकारकतेशी संबंधित आहे. यामध्ये किशोरवयीन मुलींच्या शैक्षणिक प्रगतीतील किशोरी उत्कर्ष मंच उपक्रमाची परिणामकारकता तपासण्यात आली. प्रायोगिक पध्दतीतील समतुल्य द्विगट अभिकल्पाचा वापर करून पूर्व चाचणी व उत्तर चाचणी घेण्यात आली. उत्तर चाचणीतील मिळालेल्या प्राप्तांकाचे मध्यमान काढून दोन्ही गटांच्या मध्यमानाच्या तुलनेद्वारे निष्कर्ष काढण्यात आले.

**संदर्भ साहित्य (References):**


1. भिंताडे वि. रा. : (1998), शैक्षणिक संशोधन पध्दती, तृतीय आवृत्ती नित्यनूतन प्रकाशन, पुणे
2. डॉ. खरात सुवर्णा : (2009), किशोरी उत्कर्ष मंच, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई
3. सोहनी चित्रा : (1999), पुष्प पाचवे, प्रायोगिक संशोधन पध्दती, य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक